# अधिसूचना

संदर्भ : १. सन २०१५ चा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश क्र. ५

२. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. एमसीओ- २०१५/ प्र. क्र. १८९/ नवि १४, दि. २३/०६/२०१५

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समोयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश- २०१५, दि. २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानूसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरविण्यात असलेल्या लोकसेवा पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करणे आवश्यक आहे. त्यानूसार अंबरनाथ नगरपरिषद क्षेत्रातील पात्र नागरिकांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे लोकसेवा अधिसूचित करण्यात येत आहेत. तसेच त्यांची अंमलबजावणी करणारे पदनिर्देशित अधिकारी तसेच या सेवा वेळेवर न पुरविल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि विहीत कालमर्यादा अधिसूचित करुन जाहीर प्रकटन करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश- २०१५**

**कलम- ३ अन्वये अ- वर्ग नगरपरिषदेने जाहीर करावयाच्या लोकसेवेचा तपशिल**

| अ. क्र. | लोक सेवांची सुची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत काल मर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | विहीत नमुन्यातील अर्ज | रु. २५/- प्रती प्रत | ३ दिवस | जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख ) | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे | विहीत नमुन्यातील अर्ज | रु. २५/- प्रती प्रत | ३ दिवस | जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख ) | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तव्याचा पुरावा<br>३. वयाचा पुरावा<br>४. विवाहासाठी उपस्थित साक्षीदारांचे घोषणापत्र<br>५. ९० दिवसांनंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणा पत्र | १. विवाह दिनांका पासून ९० दिवसाचे आत- रु. ५०/-<br>२. विवाह दिनांकानंतर ९० दिवस ते ३६५ दिवसाचे आत- रु. १५०/-<br>३. विवाह दिनांकाच्या ३६५ दिवसांनंतर रु. ७५०/-<br>४. विवाह नोंदणी तात्काळ फी- रु. ५००/- | ३ दिवस | विवाह नोंदणी अधिनियम १९९८ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख ) | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे | विहीत नमुन्यातील अर्ज | रु. ५०/- ( प्रती उतारा )<br>अर्जन्ट दाखला- रु. १००/- | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे | विहीत नमुन्यातील अर्ज | मालमत्ता कराबाबत- विनामुल्य | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |
| ६ | अ) दस्तऐवजांच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. दस्तऐवजांची प्रत ( खरेदी खत / बक्षीसपत्र / वाटणीपत्र व इतर ) | **अनधिकृत बांधकामाकरीता :**<br>रहिवासी- रु. ६००/-<br>वाणिज्य- रु. १,२००/<br>**अधिकृत बांधकामाकरीता :**<br>R/V- १० % प्रमाणे | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |
| | ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. वारसा हक्क प्रमाणपत्र | मंजूर ठरावाप्रमाणे रु. ३००/- | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |
| ७ | झोन दाखला देणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. ७ /१२ उतारा / सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा / सिटी सर्व्हे नकाशा | रु. २००/- प्रती सर्व्हे नंबर | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |
| ८ | भाग नकाशा देणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा / सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा / सिटी सर्व्हे नकाशा | रु. १००/- | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |
| ९ | बांधकाम परवाना देणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तुविशारदाचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे<br>४. बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती<br>५. मोजणी नकाशा<br>६. मंजूर रेखांकनाची प्रत | **छाननी फी :**<br>१. रहिवासी- रु. ४/- प्र. चौ. मी.<br>२. वाणिज्य- रु. ८/- प्र. चौ. मी.<br>३. औद्योगिक- रु. ८/- प्र. चौ. मी.<br>**विकास अधिभार :**<br>१. रहिवासी- रु. ८०/- प्र. चौ. मी.<br>२. वाणिज्य- रु. १६०/- प्र. चौ. मी.<br>३. औद्योगिक- रु. १२०/- प्र. चौ. मी.<br>४. रेखांकन/ जमिन विकास- रु. ६०/- प्र. चौ. मी.<br>स्टॉकिंग चार्जेस- १०/- प्र. चौ. मी.<br>**वृक्ष लागवड अनामत :**<br>रु. १०,०००/-(१००० चौ.मी. क्षेत्रापर्यत)<br>रु. २०,०००/-(१००० चौ.मी. वरील क्षेत्र) | ६० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | जोते प्रमाणपत्र देणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | निरंक ( विनामुल्य ) | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |
| ११ | भोगवटा प्रमाणपत्र देणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>३. जोते प्रमाणपत्र<br>४. घर मालक / वास्तुविशारद यांचे पूर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | **इमारत तपासणी फी :**<br><br>रहिवासी- रु. १,०००/-<br>वाणिज्य- रु. ५,०००/- | ३० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |
| १२ | नळजोडणी साठी ना-हरकत दाखला देणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | रु. १००/- | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |
| १३ | जलनि:स्सारण जोडणी देणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | १. **ड्रेनेज जोडणी,**<br>फी- रु. ५००/- प्रती सीट<br>२. **अनामत रक्कम,**<br>घरगुती - रु. १,०००/- प्रती सीट<br>बिगर घरगुती- रु. २,०००/- प्रती सीट | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उप मुख्य अधिकारी | मुख्याधिकारी |

**टिप :** नळ जोडणी संदर्भातील अंबरनाथ नगरपरिषदेकडील संपूर्ण पाणी पुरवठा व्यवस्था दि. ०१/०१/२०१३ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अंबरनाथ यांचे कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. नगरपरिषदेमार्फत नळ जोडणी देणेसाठी फक्त ना- हरकत दाखला देण्यात येतो.

जावक क्र. अंनप/ साप्र/ २०१५- १६/१४६,
दिनांक : १०/०७/२०१५

**( भालचंद्र गोसावी )**
मुख्याधिकारी,
अंबरनाथ नगरपरिषद